**नि.क्र. २६८ च्या आदेशावरुन प्रतिवादी क्र. ३ ते ८ तर्फे सा.क्र.६**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – शिवाजी ईश्वर सावंत.

**वय** – ५४ वर्ष, **व्यवसाय** – नोकरी,

**नेमणूक**– विद्यामंदिर देवर्डे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास – श्री. एस. आर. पोवार, वकील.**

**१.** मी १९९३ पासून शिक्षक या पदावर कार्यरत असून सध्या मी देवर्डे येथे विषय शिक्षक म्हणून कार्यरत आहे. त्याचबरोबर दि.०१.११.२०२५ रोजी पासून माझ्याकडे मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त पदभार आहे.

**२.** मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळाले आहे. मी त्यामध्ये मागणी केल्याप्रमाणे स्मिता ज्ञानदेव तेजम आणि बेबी ज्ञानदेव तेजम यांच्या नोंदीचे जनरल रजिस्टर सोबत आणले आहे. सदर रजिस्टर १४.०६.१९८२ ते १८.१२.२००१ पर्यंतचे आहे. सदर रजिस्टरमध्ये विद्यार्थीचे नाव, जात, जन्मस्थान, जन्मतारीख, शाळेत प्रवेश घेतल्याची आणि सोडल्याची तारीख, अभ्यास, वर्तणूक आणि शाळा सोडल्याचे कारण नमूद केले जाते. सदर रजिस्टरमध्ये अनु. क्र.८७२ ला स्मिता ज्ञानदेव तेजम आणि अनु. क्र. १३७३ ला बेबी ज्ञानदेव तेजम यांची नोंद असून पुढील सर्व रकाने भरलेले आहेत.

**३.** मी मागणी केल्याप्रमाणे सदर नोंदीच्या प्रमाणित प्रती आज न्यायालयात दाखल केल्या आहेत. त्यातील मजकूर मी सोबत आणलेल्या रजिस्टर मधील मूळ नोंदीप्रमाणे बरोबर असून त्या मी स्वतः तयार केलेल्या आहेत. आता मला त्या प्रती दाखवल्या, त्यावरती सत्यप्रत म्हणून माझी स्वाक्षरी व शिक्का आहे. त्यांना अनुक्रमे **नि. क्र.२७३ व २७४** देण्यात येतात.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे, वकील.**

**४.** शाळेमध्ये प्रवेश देण्यासाठी जन्मदाखला घ्यावा लागतो. मी आज स्मिता व बेबी यांच्या नोंदी घेताना दिलेले जन्मदाखले सोबत आणलेले नाहीत. मी आज सोबत आणलेले रजिस्टर स्वतः भरलेले नाही. मला ते रजिस्टर कोणाच्या हस्ताक्षरातील आहे

याबाबत सांगता येणार नाही. सदर रजिस्टर मध्ये नोंदी घेतल्या बाबत मुख्याध्यापक स्वाक्षरी करतात. नि. क्र.२७३ व २७४ वरती नोंदी घेतलयाबाबत मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व नाव नमूद नाही. साक्षीदार सांगतो, शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर शेवटी मुख्याध्यापक तपासणी करुन स्वाक्षरी करत असतात.

५. मला सदर नोंदी कोणाच्या सांगण्यावरुन घेतल्या आहेत याबाबत वैयक्तीक माहिती नाही. मला त्यातील नातेसंबंधां बाबत वैयक्तीक माहिती नाही. मी आज स्मिता व बेबी यांच्या पालकतत्वा बाबतच्या नोंदीचा कागदोपत्री पुरावा सोबत आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला साक्षीसमन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र.३ ते ८ यांनी भेटून काय पुरावा द्यायचा आहे याबाबत सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.३ ते ८ यांच्या सांगण्यावरुन आज खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र. २ तर्फे उलटतपास – श्री. व्ही. आर. पाटील, वकील.**

६. वादीने घेतलेला उलट तपास स्विकारला.

**प्रतिवादी क्र. ९ व १० तर्फे उलटतपास – श्री. एस. एम. देशपांडे, वकील.**

७. उलट तपास नाकारला.

**प्रतिवादी क्र. ११ ते १५ तर्फे उलटतपास – श्री. व्ही. बी. कडूकर, वकील.**

८. वकील गैरहजर. प्रतिवादी क्र.११ न्यायालयात हजर. त्याने उलट घेण्यास नकार दिल्यामुळे उलट तपास नाही असा आदेश करण्यात येतो.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०९.१२.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.